ॲड. ए. एस. देशमुख,
बुलडाणा.
मो. नं. :- ९८५०३०५०२४

जिल्हा व सत्र न्यायालय, बुलडाणा.

दिनांक :- २८/१२/२०२०

शोध अहवाल

प्रति,

श्री. राजेश गुलाबचंद राठी,
रा. मोताळा, ता. मोताळा,
जि. बुलडाणा.

विषय :- **मौजे मोताळा, ता. मोताळा, जि. बुलडाणा शिवार हद्दीतील, गट नं. ३ अ मधील प्लॉट नं. ८, क्षेत्रफळ ४५३.०० चौ.मिटर चे मालक श्री. राजेश गुलाबचंद राठी, रा. मोताळा, ता. मोताळा, जि. बुलडाणा यांचे उपरोक्त मालमत्तेचा शोध अहवाल.**

महोदय,

आपल्या सूचनेप्रमाणे **मौजे मोताळा, ता. मोताळा, जि. बुलडाणा शिवार हद्दीतील, गट नं. ३ अ मधील प्लॉट नं. ८, क्षेत्रफळ ४५३.०० चौ.मिटर चे मालक श्री. राजेश गुलाबचंद राठी, रा. मोताळा, ता. मोताळा, जि. बुलडाणा** या मालमत्तेच्या बाबतीत दुय्यम निबंधक कार्यालय, **मोताळा** यांच्याकडे मालकीहक्क पडताळणी शोधअहवालाच्या रितसर फी चा भरणा चलानद्वारे करून खरेदी-विक्री रजिस्टरवरून **२००८ ते २०२० या १३** वर्षांच्या कालावधीतील विषयांकित मालमत्तेचा/प्लॉटच्या व्यवहारांचा शोध घेतला. त्यावेळी मला मालमत्तेबाबत खालील व्यवहार आढळून आले,

वरील वर्णन केलेली मालमत्तेच्या गट नं. **३ अ मधील** प्लॉट नं. ८, एकूण क्षेत्रफळ ४५३.०० चौ.मिटर ही मालमत्ता पूर्वी, **आझादगिर गुरूसेवागिर, रा. मोताळा, ता. मोताळा, जि. बुलडाणा** यांची होती.

Adv. A.S. Deshmukh
Dist. & Session Court, Buldana
MAH/1567/2014

सदर प्लॉट नं. ८ ही मालमत्ता मा. उपविभागीय अधिकारी, मलकापूर यांच्या प्र.क्र.रा.प्र.क्र.एन.ए.पी.३४/मोताळा/१९४/२००७-२००८ या प्रकरणात दि. २३/०६/२००८ रोजी

Scanned by CamScanner

263/0 इतर पावती Original/Duplicate

Wednesday,23 December 2020 10:51 AM

नोंदणी क्रं. :39म

Regn.:39M

पावती क्रं.: 2864 दिनांक: 23/12/2020

गावाचे नाव: मोताळा

दस्तऐवजाचा अनुक्रमांक: मतल-0-2020

दस्तऐवजाचा प्रकार :

सादर करणाऱ्याचे नाव: ॲड ए.एस.देशमुख.

वर्णन शोध अर्ज क्र.270. मौजे मोताळा,गट नंबर 3अ/1/8 सन 2008 ते 2020 एकुण 13 वर्ष.

SEARCHFEE	रु. 325.00
एकूण:	रु. 325.00

Sub Registrar Motala

दुय्यम निबंधक श्रेणी १ मोताळा

1); देयकाचा प्रकार: eChallan रक्कम: रु.325/-

डीडी/धनादेश/पे ऑर्डर क्रमांक: MH008849940202021E दिनांक: 23/12/2020

बँकेचे नाव व पत्ता:

Scanned by CamScanner

पारीत केलेल्या आदेशानुसार पाडण्यात आलेल्या प्लॉटपैकी एक असून, अविभाज्य घटक आहे.

असे असतांना, **आझादगिर गुरूसेवागिर** यांनी त्यांचे मालकीतील व ताब्यातील प्लॉट नं. ८ हा नोंदणीकृत दस्त क्र. २९/२०१९ अन्वये दि. ०७/०१/२०१९ रोजी **श्री. राजेश गुलाबचंद राठी** यांना मौल्यवान भरणा स्विकारून विक्री केलेला आहे.

असे असतांना तदनंतर, **श्री. राजेश गुलाबचंद राठी** यांनी त्यांचे मालकीतील व ताब्यातील प्लॉट नं. ८ हा नोंदणीकृत दस्त क्र. ९७५/२०१९ अन्वये दि. २०/०५/२०१९ रोजी **आशा सचिनराव देशमुख व धनश्री अभिजीतराव देशमुख** यांना मौल्यवान भरणा स्विकारून विक्री केलेला आहे.

असे असतांना तदनंतर, **आशा सचिनराव देशमुख व धनश्री अभिजीतराव देशमुख** यांनी त्यांचे मालकीतील व ताब्यातील प्लॉट नं. ८ हा नोंदणीकृत दस्त क्र. **१६९०/२०१९** अन्वये दि. **२०/०९/२०१९** रोजी **श्री. राजेश गुलाबचंद राठी** यांना मौल्यवान भरणा स्विकारून विक्री केलेला आहे, त्यानुसार महसूल दप्तरी **फेरफार क्र. ६७३३** नुसार दि. ३१/१०/२०१९ रोजी नोंद घेण्यात आलेली आहे.

असे असतांना. **श्री. राजेश गुलाबचंद राठी** यांनी सदर्हु प्लॉट नं. ८, एकूण क्षेत्रफळ ४५३.०० चौ. मिटर हा प्लॉट निवासी मधून वाणिज्य उपयोगाकरीता परावर्तीत करणेकरीता मा. उपविभागीय अधिकारी, मलकापूर यांचेकडे अर्ज सादर करून त्यानुसार मा. उपविभागीय अधिकारी, मलकापूर यांनी त्यांचेसमोरील प्र.क्र.रा.प्र.क्र.एन.ए.पी.३४/मोताळा/०५/२०१९-२०२० या प्रकरणात दि. २७/११/२०१९ रोजी आदेश पारीत केलेला असून, त्यानुसार महसूल दप्तरी फेरफार क्र. ६७७८ नुसार दि. १६/१२/२०१९ रोजी नोंद घेण्यात आलेली आहे, व त्यानुसार **श्री. राजेश गुलाबचंद राठी** यांचे नावे ७/१२ उताऱ्याला नोंद घेण्यात आलेली असून, तेच विषयांकित मिळकतीचे मालक आहेत.

मालमत्तेबाबत मत :-

उपरोक्त विषयांकित मालमत्ता/प्लॉट हा **श्री. राजेश गुलाबचंद राठी, रा. मोताळा, ता. मोताळा, जि. बुलडाणा** यांच्या मालकीत असून, त्यांच्या मालमत्तेची मालकीहक्काबाबतची साखळी योग्य व कायदेशिररित्या प्रस्तापित झालेली असून, विषयांकित

Adv.A.S.Deshmukh
Dist. & Sess. Court
MAH/1587/2014

Scanned by CamScanner

मिळकतीवर कोणत्याही शासकीय वा निमशासकीय बँक अथवा पतसंस्थांचा कोणताही बोजा आढळून आलेला नाही. विषयांकित मालमत्ता/प्लॉट नं. १२ शोध दरम्यान कुठेही तारण, गहाण नसल्याचे अभिलेखावर दिसून आले आहे. त्यामुळे विषयांकित मालमत्तेवरील **श्री. राजेश गुलाबचंद राठी, रा. मोताळा, ता. मोताळा, जि. बुलडाणा** यांचा मालकीहक्क बाधित, वैध, कायदेशिर असून सदर मालमत्तेवर विक्रीचा व्यवहार आढळून आलेला नाही.

मालमत्तेचे वर्णन :-

मौजे मोताळा, ता. मोताळा, जि. बुलडाणा शिवार हद्दीतील, गट नं. ३ अ मधील प्लॉट नं. ८, क्षेत्रफळ ४५३.७० चौ.मिटर या मालमत्तेची चतु:र्सिमा :-

पूर्वेस	:-	प्लॉट नं. ९
पश्चिमेस	:-	रस्ता
उत्तरेस	:-	देवस्थान आणि पंढरी भिकू पाटील यांची जमीन
दक्षिणेस	:-	मलकापूर-बुलडाणा रोड

या चतु:र्सिमेच्या आतील

सदर मालमत्तेचा शोधपत्र अहवाल व मालमत्ता मालकीहक्क पडताळणी ही दुय्यम निबंधक कार्यालयातील परिशिष्ट-२ ची ऑनलाईन पध्दतीने शोध घेवून केलेली आहे. तसेच विषयांकित मालमत्तेचे मालक यांनी पुरविलेले दस्त, खरेदीखत या नुसार मालकीहक्काची पडताळणी केली असून, त्याप्रमाणे,

वरील मालमत्ता ही कोणत्याही प्रतिबंधात्मक कायद्याखाली येत नाही. शोध अहवालाचा विषय असलेली मालमत्ता ही बाजारभावाने विक्री करण्याकरिता योग्य आहे. वरील मालमत्ता ही कोणत्याही सरकारी धोरणाखाली येत नाही. **श्री. राजेश गुलाबचंद राठी, रा. मोताळा, ता. मोताळा, जि. बुलडाणा** हे सदर मालमत्तेचे मालक असल्याचे नोंदणी दस्त व महसूल अभिलेखातील दस्तानुसार मालक दिसून येतात. प्रस्तूतचा शोध अहवाल हा महाराष्ट्र शासनाचे आय.जी.आर. या संकेतस्थळावरून ऑनलाईन पध्दतीने तसेच अर्जदार यांनी पुरविलेल्या ७/१२ उतारा, फेरफार, नमूना ८, खरेदीखत, अकृषक व वाणिज्य प्रयोजनास्तव पारीत आदेशानुसार घेण्यात आलेल्या नोंदीनुसार टंकलिखित केलेला आहे.

Scanned by CamScanner

असे असले तरीसुध्दा संस्था **श्री. राजेश गुलाबचंद राठी, रा. मोताळा, ता. मोताळा, जि. बुलडाणा** यांना कर्ज देणार असल्याने काळजी घेणे अत्यावश्यक आहे. कारण ऑनलाईन शोध हा महाराष्ट्र शासनाचे आय.जी.आर. या संकेतस्थळावरून घेण्यात आलेला असून, त्यामध्ये तांत्रीक अडचणी असू शकतात किंवा नोंदणी व्यवहाराशिवाय **श्री. राजेश गुलाबचंद राठी, रा. मोताळा, ता. मोताळा, जि. बुलडाणा** यांनी शोधअहवालाचा विषय असलेल्या मालमत्तेबाबत एखादा व्यवहार, करार, मदार तथा इसार केला असल्यास त्यांची नोंद कोणत्याही अभिलेखात मिळणार नाही. ही परिस्थिती लक्षात घेता **श्री. राजेश गुलाबचंद राठी, रा. मोताळा, ता. मोताळा, जि. बुलडाणा** यांचेकडून विषयांकित मालमत्तेच्या अनुषंगाने कोणताही अनोंदणीकृत वा कोणत्याही दस्ताद्वारे मालमत्ता तारण-गहाण दिलेली नसल्याबाबत कायदेशिररित्या प्रतिज्ञालेख घेण्यात यावा.

करिता हे मालमत्ता मालकीहक्क पडताळणी शोध अहवाल सादर केला आहे.

बुलडाणा

दिनांक :- २९/१२/२०२०

ॲड. ए. एस. देशमुख
बुलडाणा

Adv.A.S.Deshmukh
& S... ...rt,Buldana
MAH/1567/2014

पावती :- शोध अहवालाबाबतची दुय्यम निबंधक, श्रेणी-१, मोताळा यांनी निर्गमित केलेली पावती नं. 2864 दि. २३/१२/२०२०, रु. ३२५/- सोबत दाखल करीत आहे.

Scanned by CamScanner